# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी -२२६२०६०१, २२६१०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६१२१०२./२२६१०००७

E-mail : dte_4a@rediff.com Internet: http / www. dte.org.in


परिपत्रक

क्रमांक : ४-४अ/आस्था/२०१५/

दिनांक : 31 AUG 2015

विषय : विदेश दौऱ्यास मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ : १) शासन निर्णय क्र. जीईसी ३३९६/(७३७६)/तांशि-१, दि. १०/०४/१९९७.
२) शासन निर्णय क्र. जीईसी १०९७/(१२९३)/तांशि-१ दि. १०/०४/१९९७.
३) शासन निर्णय क्र. परंदौ-१४१४/प्र.क्र.४६/११. दि. १४/१२/२०१४.

संदर्भ क्र. ३ च्या शासन परिपत्रकान्वये राज्यसेवेतील अधिकारी यांच्या विदेश दौऱ्याचे प्रस्ताव शासनास सादर करणेसंबंधी मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहे. सदर मार्गदर्शक सुचनांमधील अनुक्रमांक १२ व १३ मध्ये जे शासनाचे अधिकारी कर्मचारी स्वखर्चाने स्वतःची रजा घेवून विदेशात प्रशिक्षण, चर्चासत्र, शोधनिबंध, विदेशात राहणाऱ्या नातेवाईकांना भेटणे, पर्यटन, वैद्यकीय उपचार घेणे अशा खाजगी कारणासाठी विदेश दौरा करणार आहे अशी प्रकरणे शासनास सादर करण्याची आवश्यकता नाही मात्र अशा प्रकरणी अधिकारी/कर्मचाऱ्यास रजा मंजूर करण्यास सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्व परवानगी घेण्यात यावी असे नमूद केलेले आहे.

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली पदवी व पदविका संस्थांतील गट अ व ब मधील अधिकाऱ्यांचे रजा मंजूरीचे प्राधिकार संदर्भ क्र. २ व ३ च्या शासन निर्णयान्वये (विशिष्ट कालावधी) कार्यालय प्रमुख/संबंधी सहसंचालक यांना प्राधिकारित करण्यात आलेले आहे.

त्यामुळे या परिपत्रकाद्वारे सर्व कार्यालय प्रमुख व सहसंचालक यांना कळविण्यात येते की, संदर्भाधिन क्र. ३ च्या शासन निर्णयातील तरतूदीनूसार संदर्भ क्र. १ व २ च्या शासन निर्णयान्वये प्राधिकृत केल्यानुसार अधिकारी कर्मचाऱ्यांच्या खाजगी स्वरुपाच्या स्वखर्चाने करावयाच्या विदेश दौऱ्यास प्रकरण परत्वे संबंधीत प्राधीकाऱ्यांनी मान्यता द्यावी. अशी प्रकरणे संचालनालयास सादर करण्यात येवू नयेत.

संबंधीत प्राधीकाऱ्यांच्या रजा मंजूर करण्याच्या प्राधीकारात न बसणारी प्रकरणे मात्र, शासन परिपत्रकाचे अनुषंगाने तपासून तंत्रशिक्षण संचालनालयास पुर्वीप्रमाणेच पुढील कार्यवाहीसाठी विहीत मुदतीपुर्वी सादर करण्यात यावीत.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,
सहसंचालक तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
मुंबई | पुणे | नाशिक | औरंगाबाद | अमरावती | नागपूर

क्रमांक :- आस्था/परदौरा/२०१५/2989
दिनांक :- 3 DEC 2015

प्रति.
प्राचार्य, शासकीय अभि. महा. अमरावती / शा. अभि. महा. अम.
प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती / यवतमाळ / खामगांव / वाशिम / मूर्तिजापूर, प्राचार्य, शा. निवासी महिला तंत्रनिकेतन, दर्यापूर शांना,
माहितीस व आवश्यक कार्यवाही करिता.

सहसंचालक
तंत्र शिक्षण, अमरावती.